# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

क्र. मऔविम/भुविभाग/कार्यासन-१/A4P62

"उद्योग सारथी",
मरोळ औद्योगिक क्षेत्र,
महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई-९३
दिनांक : 5/2/14

## परिपत्रक

**विषय : विशाल, अति-विशाल प्रकल्पांना वाटप केलेल्या भूखंडांचा विकास कालावधी वाढविणेबाबत..**

संदर्भ : १. परिपत्रक क्र.मऔविम/विधी व कामकाज विभाग/३८, दिनांक २८.०१.२००८.
२. परिपत्रक क्र.मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/३३२२/२०१२, दिनांक १९.१२.२०१२.
३. परिपत्रक क्र.मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/२५९६६, दिनांक २२.०१.२०१३.

महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये शासन मान्य विशाल, अति-विशाल प्रकल्प, परकीय गुंतवणूक (FDI), फॉर्च्युन ग्लोबल-५००/२००० कंपन्या, इकॉनॉमिक टाईम्स २००/५०० कंपन्या, फोर्बस ग्लोबल-२०००/ एशीया बेस्ट-२००/ एशीया-५० कंपन्या, औद्योगिक प्रयोजनाशी निगडीत महाराष्ट्र व केंद्र सरकाचे उपक्रम इत्यादींना प्राधान्याने वाटप केलेल्या भूखंडाच्या विकासासाठी प्रभाग (Zone) विचारात न घेता सरसकट दोन वर्षांचा कालावधी देण्यात येतो (भूखंडाचा ताबा दिल्याचा दिनांक अथवा करारनामा केल्याचा दिनांक यापैकी जो दिनांक अगोदर असेल तो ग्राहय धरण्यात येतो) आणि सदर कालावधीनुसार भूखंडधारकाला बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेऊन उत्पादनात जाणे बंधनकारक करण्यात आले आहे. तथापि, विशाल प्रकल्प उभारणीमध्ये मोठया प्रमाणात गुंतवणूक होत असल्याने आर्थिक सहाय्य उभारणीसाठी लागणारा कालावधी, तसेच मोठया प्रमाणात होणा-या बांधकामासाठी जास्त कालावधीची लागणारी गरज, त्याचबरोबर शासनाच्या विविध प्राधिकरणांकडून प्रकल्पासाठी आवश्यक असणा-या परवानग्या/ना हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी लागणारा कालावधी, स्थानिक शेतक-यांकडून प्रकल्पास असणारा विरोध विचारात घेता दोन वर्षांच्या कालावधीमध्ये विशाल प्रकल्पांसाठी वाटप केलेल्या भूखंडाचा विकास करणे शक्य होत नसल्याने औद्योगिक क्षेत्रामध्ये विशाल प्रकल्प/अति-विशाल प्रकल्प सदराखाली वाटप केलेल्या उद्योजकांनी भूखंड विकासासाठी नमूद केलेला कालावधी वाढवून मिळण्याची विनंती केल्याने त्याबाबतचा विषय महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक २८.०८.२०१३ रोजी झालेल्या ३५२ व्या सभेत सादर करण्यात आला होता. सदरहू विषयावर संचालक मंडळाच्या सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन ठराव क्रमांक ५२६२ पारित करण्यात आला. तथापि, महामंडळाच्या दि. २७.११.२०१३ रोजीच्या बैठकीमध्ये

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

पारित ठराव क्र. ५२६२ मध्ये दुरुस्तीसह मान्यता देण्यात आल्याने त्या अनुषंगाने भूखंडाच्या विकास कालावधीच्या धोरणात पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे:

(१) महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये शासन मान्यता प्राप्त विशाल, अति-विशाल प्रकल्पांकरीता प्राधान्याने वाटप केलेल्या भूखंडांकरीता प्राधान्याने भूखंड वाटपाचे धोरण आणि त्या भूखंडांच्या विकास करण्यासंदर्भातील धोरणामध्ये बदल न करता फक्त भूखंड विकासाचा कालावधी प्रभाग (Zone) विचारात न घेता सरसकट दोन वर्षां ऐवजी चार वर्षे किंवा शासनासोबत केलेल्या सामंजस्य करारामध्ये (MOU) नमूद केलेला कालावधी यापैकी जो कमी असेल तो कालावधी भूखंड विकासासाठी देण्यात येत आहे.

(२) तसेच, यापूर्वी ज्या उद्योजकांना विशाल, अतिविशाल प्रकल्प सदराखाली प्राधान्याने भूखंड वाटप करण्यात आले आहे व ज्यांनी अद्याप बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेतलेला नाही, अशा उद्योजकांना सदरचे धोरण लागू करण्यात येत आहे.

याव्यतिरिक्त इतर कोणताही बदल संदर्भिय परिपत्रकामध्ये करण्यात आलेला नाही.

सदरहू परिपत्रक विधी विभागाचे सहमतीने आणि मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(डॉ. पी. अन्बलगन)**
सह मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई.

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in